# पाटपन्हाळे विद्यालयात सायबर सुरक्षेबाबत अभियान

गुहागर : रत्नागिरीतील गोगटे–जोगळेकर महाविद्यालयाच्या सायबर ऑरिअर क्लब व क्विक हिल फाऊंडेशनच्या सहकार्याने सायबर सुरक्षा जागरुकता मोहीम कार्यक्रम पाटपन्हाळे येथील न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय राबवण्यात आला.

प्रा. केतन जोगळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबवलेल्या या मोहिमत सायबर सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. यावेळी सायबर ऑरिअर क्लबचे सदस्य वैष्णवी शिरसाट, स्नेहा भिडे, चिन्मय सुर्वे, सचिन राठोड यांनी सायबर गुन्हे टाळण्यासाठी आवश्यक सावधगिरीचे उपाय सांगताना डीजीटल समाज माध्यमांचा वापर करताना विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले.

मुख्याध्यापिका एस. एस. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे शिक्षण काळाची गरज असल्याचे सांगितले. चव्हाण यांच्याहस्ते प्रा. जोगळेकर यांचा सत्कार करण्यात आला.